**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबई मेट्रोच्या कामापैकी ५० किलोमीटरचे टप्पे या वर्षी, तर ६२ किलोमीटरचे टप्पे पुढच्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी

- संघ लोक सेवा आयोगाच्या अध्यक्षपदी  डॉ. अजय कुमार यांची नियुक्ती

**आणि**

- खेलो इंडिया स्पर्धेत १२६ पदकं मिळवून महाराष्ट्र अव्वल स्थानी कायम

**<><><><><>**

मुंबई मेट्रोच्या कामापैकी ५० किलोमीटरचे टप्पे या वर्षी, तर ६२ किलोमीटरचे टप्पे पुढच्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलं. फडणवीस यांच्या उपस्थितीत दहिसर ते काशीगाव या मेट्रोच्या टप्प्याची तांत्रिक तपासणी आज झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. हा टप्पा प्रवाशांसाठी खुला झाल्यावर पश्चिम द्रुतगती मार्गावरची वाहतूक कोंडी कमी व्हायला मदत होईल, असं फडणवीस म्हणाले. विविध ठिकाणचे मेट्रो मार्ग एकमेकांशी जोडण्याचं कामही सुरू असून यामुळे मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्रात प्रवास करणं सोयीचं होईल, असंही त्यांनी सांगितलं. वाढवण बंदराजवळ बुलेट ट्रेनचं स्थानक असून

त्याच्याशी मेट्रो जोडण्याची आखणीही सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मान्यवर  यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

संपूर्ण राज्य रेल्वेफाटकमुक्त करायच्या उद्देशानं महारेलनं राज्यभरात मोठ्या प्रमाणात रेल्वे पूल बांधण्याचं काम हाती घेतलं असून यापैकी ३२ पूल पूर्ण झाले आहेत, तर या वर्षी २५ पूल पूर्ण होतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली.  मुंबईत रे रोड केबल स्टेड रोड ओव्हरब्रिज आणि टिटवाळा रोड ओव्हर ब्रिजचं लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते.

**<><><><><>**

भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी आज नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली.

**होल्ड -बाईट**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे सभापती ओम बिरला,  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचे इतर सदस्य,  आणि सर्वोच्च न्यायालयातले इतर न्यायाधीश या समारंभाला उपस्थित होते.

**<><><><><>**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजी महाराजांना वंदन केलं आहे.

शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक, हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती छत्रपती संभाजी राजे यांना जयंतीदिनी मानाचा मुजरा, अशा शब्दात फडणवीस यांनी संभाजी महाराजांना अभिवादन केलं आहे. हिमालयाएवढे शौर्य असलेले महापराक्रमी छत्रपती संभाजी महाराज यांना जयंतीदिनी मानाचा मुजरा, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिवादन केलं आहे.

नवी दिल्लीत महाराष्ट्र सदनामध्ये तसंच, महाराष्ट्र परिचय केंद्रात आज संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केलं.

<><><><>

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित भारताचा महागाई दर यावर्षी एप्रिल महिन्यात कमी होऊन ८५ शतांश टक्क्यावर आल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे. मार्च महिन्यात हा दर अडीच टक्के होता. खाद्यान्न, इंधन,  दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती घटल्याने महागाई दरात घट झाली आहे.

खाद्यान्न निर्देशांकावर आधारित महागाई दर कमी होऊन २ पूर्णांक ५५ शतांश टक्के झाला आहे. गेल्यावर्षी तो ४ पूर्णांक ६६ शतांश टक्के इतका होता. अन्न उत्पादनाच्या  किमतीत वाढ झाल्यामुळे महागाई दरात घट झाल्याचं मंत्रालयानं◌ं म्हटलं आहे. चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाई दर चार टक्क्याच्या आसपास राहील असा अंदाज  रिझर्व्ह बँकेने वर्तवला होता, मात्र भाजीपाला, फळं, डाळी यांचे दर कमी झाल्याने एप्रिल

महिन्यात किरकोळ महागाई दर ३ पूर्णांक १६ शतांश टक्क्यावर आला आहे. जुलै २०१९ नंतर हा सर्वात नीचांकी किरकोळ महागाई दर आहे.

<><><><><>

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी डॉ. अजय कुमार यांची संघ लोक सेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. कार्मिक आणि प्रशिक्षण विभागानं जारी केलेल्या आदेशानुसार, अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यावर डॉ. कुमार यांचा कार्यकाळ सुरु होईल. डॉ. कुमार भारतीय प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाले आहेत. ते १९८५ च्या तुकडीतले केरळ केडरचे अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी संरक्षण सचिव म्हणून काम पाहिलं आहे.

<><><><><>

दहशतवादाविरोधात भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचं देशोदेशीच्या संरक्षण विषयक तज्ञांनी कौतुक केलं आहे. अमेरिकेचे माजी लष्करी अधिकारी डॉन स्पेन्सर आणि ऑस्ट्रियातले तज्ञ लेखक टॉम कूपर यांनी या नेमक्या हालचालींबद्दल तसंच हवाई दल आणि लष्कराच्या योग्य वापराबद्दल या कारवाईची प्रशंसा केली आहे. दहशतवादाविरोधात लढताना अण्वस्त्रांच्या धमकीसमोर न झुकण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भूमिका प्रशंसनीय असल्याचा उल्लेख दोन्ही तज्ज्ञांनी आपापल्या समाज माध्यमावरच्या लिखाणात केला आहे.

<><><><><>

देशाच्या तिन्ही संरक्षण दलांच्या मुख्य अधिकाऱ्यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. संरक्षणदल प्रमुख जनरल अनिल

चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, हवाईदल प्रमुख एअरचीफ मार्शल ए.पी. सिंग, आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी राष्ट्रपतींना ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती दिली. दहशतवादाचा मुकाबला करताना सेनादलांनी दाखवलेल्या समर्पण आणि शौर्याचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं.

<><><><><>

सरकारचं खंबीर नेतृत्व आणि ऑपरेशन सिंदूरचं महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पक्षाने कालपासून देशभर तिरंगा यात्रेचं आयोजन केलं आहे. येत्या २३ मे पर्यंत तिरंगा यात्रा देशभर सुरू राहणार असून यामध्ये सैन्य दलांचे निवृत्त अधिकारी कर्मचारी आणि अनेक सामाजिक कार्यकर्तेही सहभागी होणार आहेत.

दक्षिण मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून आज मुंबई भाजपाने तिरंगा यात्रेचं आयोजन केलं आहे.

<><><><><>

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपूर जिल्ह्यातल्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध सेवांचा आढावा घेतला. कामठी इथलं रुग्णालय ५० खाटांवरून १०० खाटांचं करण्यासाठी ६ एकर जागा उपलब्ध करुन देण्यात येईल, असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. प्राथमिक आरोग्य केंद्र कन्हान, मोहपा, मोवाड या रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करुन ग्रामीण रुग्णालयामध्ये रुपांतर करायलाही या बैठकीत मान्यता देण्यात आली. कुही इथलं सध्याचं ३० खाटांचं ग्रामीण रुग्णालय ५० खाटांचं करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत, आज महाराष्ट्राची एकूण पदक संख्या १२६ झाली आहे.  स्पर्धेच्या १० व्या दिवशी काल महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची शतकपूर्ती केली. सध्या ४९ सुवर्ण आणि ४० रौप्य आणि ३७ कांस्य पदकं मिळवून महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. २० सुवर्ण आणि ९ रौप्य पदकांसह ४२ पदकं मिळवून राजस्थान दुसऱ्या तर हरियाणा तिसऱ्या स्थानावर आणि कर्नाटक चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. खेलो इंडिया स्पर्धेचा आज ११वा दिवस असून उद्या समारोप होईल.

**<><><><><>**

वसई-विरार परिसरात सक्तवसुली संचालनालयानं आज १३ ठिकाणी छापे टाकले. ४१ अवैध इमारतींशी संबंधित प्रकरणात हे छापे टाकण्यात आले आहे.

**<><><><><>**

सांगली जिल्ह्यात वाळवा, मिरज,तासगाव, खानापूर, पलूस,जत आणि कवठेमहांकाळ  तालुक्यात रात्री उशिरापर्यंत मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस झाला.

मुंबई , ठाणे, रायगड जिल्ह्यांमध्ये काल दिवसभर ढगाळ हवामान होतं. काही ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह हलका पाऊस झाल्यानं तापमानात घट झाली. मुंबईच्या साकीनाका परिसरात पाणी साचण्याच्या घटना घडल्या. येत्या चार- पाच दिवसांत मुंबई शहर आणि आसपास ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागानं

वर्तवली आहे. ठाणे, रायगड जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. इथे येत्या शुक्रवारपर्यंत मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचे वारे वाहतील तसंच तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा अंदाज हवामानविभागानंव्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**